जनसंपर्क कक्ष

18 MAR 2026 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'राज्यशास्त्रातील नवीन प्रवाह'वर विद्यापीठात चर्चासत्र

**प्रतिनिधी**

कोल्हापूर

राज्यशास्त्रातील सिद्धांत आणि प्रत्यक्ष राजकीय व्यवहार यामध्ये वाढत चाललेली विसंगती समजून घेणे आणि त्यावर नव्या पद्धतीने विचारमंथन करणे अत्यावश्यक आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ राजकीय विचारवंत डॉ. पी. डी. देवरे यांनी केले.

'राज्यशास्त्रातील नवीन प्रवाहांचे चर्चाविश्व" या विषयावर शिवाजी विद्यापीठात आयोजित दोनदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रामध्ये ते बोलत होते.

शिवाजी विद्यापीठाचा राज्यशास्त्र अधिविभाग, नेहरू अभ्यास केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ, राज्यशास्त्र परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यशास्त्र परिषदेचे ३१ वे अधिवेशन आणि दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे शुक्रवारी उद्घाटन झाले. मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख यांच्या हस्ते चर्चासत्राचे उद्घाटन झाले. यावेळी प्राचार्य पाटील व डॉ. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

अधिष्ठाता डॉ. देशमुख, डॉ. भारती पाटील संमेलनाध्यक्ष प्राचार्य डॉ. अरुण चव्हाण यांनी मनोगत केले. डॉ. रविंद्र भणगे यांनी लिहीलेल्या 'भूराजकारण, तंत्रज्ञान आणि भविष्यातील जागतिक व्यवस्था" या पुस्तकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. डॉ. नेहा वाडेकर यांनी परिचय करून दिला. डॉ. दत्ता सावंत यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुखदेव उंदरे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. टी.एम. पाटील, डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. श्रीराम पवार, उपस्थित होते.

18 MAR 2026 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

"A++" Accredited by NAAC (2021) with CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**Tender ID – 2026-suk_1287766_1**

शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रामधील सांगली येथील कृष्णा नदीवर आयोजित करणेत येणाऱ्या सन २०२५–२६ या वर्षामधील "अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कनोईंग व कायाकिंग" (पुरुष व महिला स्पर्धा) आंतरविद्यापीठ स्पर्धा दि.०५/०४/२०२६ ते दि.१०/०४/२०२६ या कालावधीमध्ये आयोजित करण्यात येणार असुन सदर स्पर्धेसाठी प्रत्यक्ष लागणारे मंडप, स्टेज, बैठक व्यवस्था, खुर्च्या इतर साहित्य पुरविणे इ. कामांसाठी अनुभवी कंत्राटदारांकडून जाहीर ई–निविदा मागविण्यात येत आहेत. निविदा अर्ज, नियम व अटी हया महाराष्ट्र शासनाच्या "https://mahatenders.gov.in" संकेतस्थळावर उपलब्ध होतील. कोणत्याही निविदा मंजूर/नामंजूर करण्याचा अंतिम अधिकार विद्यापीठाने राखून ठेवला आहे. तसेच यापुर्वी विद्यापीठामध्ये अशा स्वरूपाचे असमाधानकारक काम केलेल्या कंत्राटदारांची दरपत्रके नामंजूर करण्यात येईल.

शिवाजी वि./असियांत्रिकी/
दि.१८/०३/२०२६

डॉ. व्ही. एन. शिंदे
कुलसचिव

1 8 MAR 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ. कोल्हापूर

पुण्यनगरी



ज्ञान-विज्ञान

डॉ. व्ही.एन. शिंदे

# वैज्ञानिक दृष्टिकोन!

**तत्त्वज्ञानामुळे मानवाला विचार करण्याच्या पद्धती मिळाल्या. प्रश्न विचारणे, तर्क लावणे आणि निरीक्षण करणे, या प्रक्रियांना मानवी जीवनात महत्त्व मिळाले.**

मानव विचार करणारा प्राणी म्हणून ओळखला जातो. पृथ्वीवर लक्षावधी ज्ञात आणि कोट्यवधी अज्ञात, अनेक जीव, प्रजाती आहेत. या सर्वांमध्ये सखोल विचार करणे, अनुभवांचे विश्लेषण करणे आणि त्यातून ज्ञान निर्माण करण्याची क्षमता मानवांमध्ये विकसित झाली. सुरुवातीस मानवी जीवन पूर्णतः निसर्गावर अवलंबून होते. मानवही निसर्गाचा एक घटक म्हणून रहात असे. अन्नासाठी शिकार करायचा, कंदमुळे, फळे गोळा करायचा. नंतरचा वेळ तो निसर्गातील बदल समजून घेण्यासाठी वापरायचा. या प्रक्रियेतून त्याने निरीक्षणे केली, अनुभवातून शिकून शेती करण्यापर्यंत प्रगती केली. खरे तर हे मानवाचे वागणे मूळ निसर्ग नियमांच्या विरुद्ध होते. मात्र, यातून उपलब्ध झालेल्या वेळेमध्ये मानवाने आपले अनुभव सांगण्यास सुरुवात केली. पुढे निव्वळ अनुभव आणि चिंतनातून हळूहळू विचारांची देवाणघेवाण सुरू झाली आणि ज्ञाननिर्मितीची प्रक्रिया सुरू झाली.

सुरुवातीला अनुभव आणि त्यातून प्राप्त ज्ञान मौखिक पद्धतीने पुढच्या पिढीकडे जात असे. कथांतून, गीतांतून आणि परंपरांमधून ज्ञान जपले जात असे. वस्ती करण्यास सुरुवात केल्यापासून लोकसंख्या वाढू लागली. व्यापार आणि प्रशासन वाढू लागले, माहिती कायमस्वरूपी जतन करणे गरजचे झाले, ज्ञानव्यवहार गुंतागुंतीचे झाले आणि या ज्ञानाची नोंद ठेवण्याची गरज निर्माण झाली. त्यातून सर्वांना समजतील असे संकेत (आजची अक्षरे) ठरवण्याची गरज निर्माण झाली. अगदी सुरुवातीला चित्रांमधून ज्ञान सांगण्यात येत असे. या पद्धतीमध्ये गावागावांमध्ये बदल येणे स्वाभाविक होते. त्यामध्ये एकसूत्रता आणून लेखनसंस्कृती विकसित झाली. सर्वात प्राचीन लेखनपद्धती म्हणून साधारण पाच हजार वर्षांपूर्वी वापरण्यास सुरुवात झालेली, सुमेरियन संस्कृतीतील 'क्यूनिफॉर्म लिपी' ओळखली जाते. ही लिपी मातीच्या फलकांवर खोदून लिहित असत. सर्वसाधारण त्याच काळात इजिप्तमध्ये चित्रलिपी म्हणजेच हायरोग्लिफिक्स वापरत असत. सुरुवातीस लेखनपद्धती ज्ञान नोंदवण्यापेक्षा व्यापार, कर, राजकीय आदेश आणि धार्मिक नोंदी नोंदवण्यासाठी वापरत. काही ज्ञानार्थींनी मात्र ज्ञानाची नोंद करण्यासाठी ग्रंथलेखन केले. लेखन संस्कृतीमुळे ज्ञान जतन होऊ लागले आणि ज्ञानप्रसारास गती मिळाली.

लेख ऐकण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.

भारतालाही ज्ञानपरंपरेचा प्राचीन वारसा आहे. सुरुवातीस मौखिक स्वरूपात गुरु-शिष्य परंपरेतून पाठांतराने जपले गेलेले ज्ञान, ब्राम्ही आणि इतर लिप्यांच्या विकासानंतर वेद, उपनिषदे आणि इतर धार्मिक ग्रंथातून जतन करण्यात येऊ लागले. लेखनामुळे विचारांना स्थैर्य आले आणि अधिकृतता प्राप्त झाली. त्यावर चर्चा आणि विचारमंथन करणे सोपे झाले. ज्ञानाच्या विकासासोबत मानवाने जीवन, विश्व आणि निसर्ग याबद्दलच्या प्रश्नांची उत्तरे शोधण्यास सुरुवात केली. ही पृथ्वी कशी निर्माण झाली? जग कसे निर्माण झाले? मानवाचे जीवन काय आहे? सत्य म्हणजे काय? या आणि अशा प्रश्नांतून उत्तरे शोधता, शोधता तत्त्वज्ञानाचा जन्म झाला. जगातील अनेक विचारवंतांनी या प्रश्नांवर त्या त्या काळातील आकलनानुसार सखोल विचार मांडले. अगदी सुरुवातीला ग्रीक तत्त्वज्ञांनी या कार्यात महत्त्वाची भूमिका बजावली. सॉक्रेटिस यांनी ज्ञान आणि नैतिकतेबद्दल प्रश्न विचारण्याची पद्धत विकसित केली. त्यांची 'संवाद पद्धती' (सॉक्रेटिक मेथड) आजही प्रसिद्ध आहे. त्यानंतर प्लेटो यांनी आदर्श राज्य, न्याय आणि ज्ञान याबद्दलचे महत्त्वपूर्ण चिंतनपूर्ण आपले विचार मांडले. प्लेटोचे शिष्य अरिस्टॉटल यांनी तत्त्वज्ञानासोबतच जीवशास्त्र, तर्कशास्त्र आणि राजकारण या संदर्भातील प्रश्नांना हात घातला आणि आपले चिंतन लिखित स्वरूपात मांडले. त्यांचे अनेक विचार विज्ञानाच्या कसोटीवर न टिकणारे होते, तरीही त्यांचा निरीक्षण आणि वर्गीकरणावर भर होता, त्यातून पुढे विज्ञानाच्या विकासाला दिशा मिळाली.

भारतीय तत्त्वज्ञान परंपराही तितकीच किंवा त्यापेक्षाही समृद्ध आहे. गौतम बुद्ध यांनी दुःख, त्याची कारणे आणि त्यातून मुक्तीचा मार्ग सांगितला. हे सांगताना त्यांनी, 'केवळ मी सांगतो म्हणून ते मान्य करू नका. तुमच्या अनुभवाला बुद्धीने तपासून, जर ते पटले, तरच मान्य करा' असा अत्यंत मौलिक उपदेश केला. नेमका वैज्ञानिक दृष्टिकोन याच पायावर आधारीत आहे. तत्त्वज्ञानामुळे मानवाला विचार करण्याच्या पद्धती मिळाल्या. प्रश्न विचारणे, तर्क लावणे आणि निरीक्षण करणे, या प्रक्रियांना मानवी जीवनात महत्त्व मिळाले. यातूनच पुढे निसर्गातील घटनांसंदर्भात वैज्ञानिक पद्धतीने स्पष्टीकरण देण्याचा अनेक विचारवंतानी प्रयत्न सुरू केला. सुरुवातीला निसर्गातील घटना देवामुळे घडतात, असा सार्वत्रिक, सर्वच देशांमध्ये समज होता. पूर, वीज पडणे, पाऊस किंवा भूकंपासारख्या घटनांना दैवी शक्तींशी जोडले जायचे. परंतु, पुढे मानवाने यामागची कारणे शोधण्याचा प्रयत्न सुरू केला. त्यांचा अभ्यास करून त्यामागील निसर्ग नियम शोधण्याचा आणि मांडण्याचा प्रयत्न केला. पंधराव्या शतकानंतर युरोपमध्ये विज्ञानाच्या विकासाला वेग आला. मात्र, त्याहीपूर्वी थैलस ऑफ मिलेट यांनी पाण्यापासून संपूर्ण जीवसृष्टी आली असावी, असे सांगितले होते. पुढे कोपर्निकसने सूर्य हा केंद्र असून इतर ग्रह त्याभोवती फिरतात असे सांगितले. मात्र, त्यांचे सांगणे वैज्ञानिकांच्या वर्तुळापुरते मर्यादित राहिले. पुढे गॅलिलिओ गॅलिली यांनी निरीक्षण आणि प्रयोगांचे महत्त्व सांगितले. लोकांसमोर प्रयोग करून ते सत्य लोकांना सांगत. शत्रू सैन्याच्या हालचाली टिपण्यासाठी विकसित झालेली दुर्बीण, त्यांनी आकाशाकडे वळवून ग्रहताऱ्यांचा अभ्यास केला आणि अनेक नवीन निरीक्षणे नोंदवली.

मात्र, विज्ञानाचा मार्ग सोपा नव्हता. गॅलिलिओ आणि इतर अनेक संशोधकांनी समाजाला सत्य सांगण्याचा प्रयत्न केला. अनेक संशोधकांचे मत धार्मिक संकल्पनांना धक्का देणारे होते. अशा प्रसंगात संशोधकांवर खटले भरण्यात येत आणि त्यांना मोठी शिक्षा सुनावण्यात येत असे. यातील सर्वात मोठा गाजलेला खटला हा गॅलिलिओ यांचा. गॅलिलिओ यांच्या मतानुसार पृथ्वी गोल आहे, पृथ्वी सूर्याभोवती फिरते. आज हे सर्वमान्य असले तरी त्यांचे म्हणणे धार्मिक संकल्पनांविरुद्ध होते, त्यामुळे त्यांच्यावर खटला भरण्यात आला. देहदंडाची शिक्षा सुनावण्यात आली. पुढे न्यायाधीश मित्राच्या सूचनेनुसार माफी मागितल्याने शिक्षा नजरकैदेत बदलली. मात्र, नजरकैदेतही त्यांनी ग्रंथलेखन केले. त्या ग्रंथाची प्रत सार्टी या विद्यार्थ्यासोबत इटालीच्या बाहेर पाठवली आणि सत्य लोकांसमोर मांडले. निसर्गातील घटक आणि घटनांचा अभ्यास करणारे विज्ञान म्हणजे निसर्गविज्ञान. भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, भूगोल या विषयांचा निसर्गविज्ञानात समावेश होतो. या विज्ञानांमध्ये निरीक्षण, प्रयोग आणि तर्काधारे सत्य शोधण्यात येते. याच वैज्ञानिक पद्धतीमुळे ज्ञान अधिक अचूक आणि विश्वसनीय झाले.

संपर्क : ९६७३७८४४००

**18 MAR 2026**

**सकाळ**

"A++" Accredited by NAAC (2021) with CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**Tender ID – 2026-suk_1287766_1**

शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रामधील सांगली येथील कृष्णा नदीवर आयोजित करणेत येणाऱ्या सन २०२५–२६ या वर्षामधील "अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कनोईंग व कायाकिंग" (पुरुष व महिला स्पर्धा) आंतरविद्यापीठ स्पर्धा दि.०५/०४/२०२६ ते दि.१०/०४/२०२६ या कालावधीमध्ये आयोजित करण्यात येणार असुन सदर स्पर्धेसाठी प्रत्यक्ष लागणारे मंडप, स्टेज, बैठक व्यवस्था, खुर्च्या इतर साहित्य पुरविणे इ. कामांसाठी अनुभवी कंत्राटदारांकडून जाहीर ई–निविदा मागविण्यात येत आहेत. निविदा अर्ज, नियम व अटी हया महाराष्ट्र शासनाच्या "https://mahatenders.gov.in" संकेतस्थळावर उपलब्ध होतील. कोणत्याही निविदा मंजूर/नामंजूर करण्याचा अंतिम अधिकार विद्यापीठाने राखून ठेवला आहे. तसेच यापुर्वी विद्यापीठामध्ये अशा स्वरूपाचे असमाधानकारक काम केलेल्या कंत्राटदारांची दरपत्रके नामंजूर करण्यात येईल.

शिवाजी वि./अभियांत्रिकी/
दि.१८/०३/२०२६

डॉ. व्ही. एन. शिंदे
कुलसचिव

1 8 MAR 2026

पुढारी

# 'विद्यार्थिनींमध्ये वाचन संस्कृती रुजणे आवश्यक'

**कोल्हापूर :** विद्यार्थिनींमध्ये वाचनाची संस्कृती रुजणे आवश्यक आहे, असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थिनी वसतिगृहाच्या हॉस्टेल डे कार्यक्रमात ते बोलत होते. कुलसचिव डॉ. शिंदे यांनी विद्यार्थिनींनी आयुष्यात उच्च ध्येय ठेवून ते साकारण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन केले. स्पर्धा परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थिनींचा यावेळी सत्कार करण्यात आला. हॉस्टेल डे निमित्त १९ सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. डॉ. माधुरी वाळवेकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. कविता वड्राळे यांनी अहवाल वाचन केले. डॉ. मीना पोतदार, डॉ. नीलांबरी जगताप यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

18 MAR 2026

सकाळ

# निसर्गाच्या शाळेनं शिकवलं, तेच लोकांना सांगते

## बीजमाता राहिबाई पोपेरे : विद्यापीठात दिला माती, जंगल, पर्यावरण वाचविण्याचा संदेश



कोल्हापूर : पद्माराजे स्मृती व्याख्यानमालेत बोलताना राहिबाई पोपेरे. व्यासपीठावर उपस्थित डावीकडून प्रिया देशमुख, प्रतिभा देसाई, सुहासिनी पाटील, ज्योती जाधव, भारती पाटील, आसावरी जाधव.

कोल्हापूर, ता. १७ : 'मी कोणत्याही शाळेत शिकलेले नाही, पण निसर्गाच्या शाळेनं मला जगण्याचं खरं शिक्षण दिलं, तेच मी लोकांना सांगत असते', असे प्रांजळपणे सांगत बीजमाता पद्मश्री राहिबाई पोपेरे यांनी आपल्या आयुष्यभराच्या कार्याचे इंगित उलगडले. शिवाजी विद्यापीठात पद्माराजे स्मृती व्याख्यानमालेत त्यांनी माती, निसर्ग, जंगल आणि रानभाज्या जपण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

विद्यापीठातील शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन, पर्यावरणशास्त्र अधिविभाग, यशवंतराव चव्हाण सेंटर फॉर रुरल डेव्हलपमेंट आणि समाजशास्त्र अधिविभागाने पोपेरे यांचे 'देशी बियांचे संवर्धन आणि स्त्रियांची भूमिका' या विषयावर विशेष व्याख्यान आज झाले. अध्यक्षस्थानी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव होत्या.

राहिबाई पोपेरे म्हणाल्या, 'रासायनिक शेतीमुळे वाढणारे आजार, बदलती जीवनशैली आणि पारंपरिक अन्नधान्यापासून दूर जाण्याचे दुष्परिणाम स्वतःच्या आयुष्यात भोगले. त्यामुळेच देशी वाणांकडे वळले. पूर्वीच्या काळात रानभाज्या, कंदमुळे आणि स्थानिक धान्य खाल्ल्यामुळे लोक दीर्घायुषी आणि निरोगी होते. आज मात्र आपण पैशाने विष खरेदी करून खात आहोत.'

### राहिबाई म्हणाल्या...

- **जंगल जाळून आपण स्वतःचं नुकसान करतो.**
- **निसर्ग वाचवायचा असेल तर झाडे, रानभाज्या आणि जैवविविधता जपली पाहिजे.**
- **रानभाज्यांचे औषधी गुणधर्म, पारंपरिक बियाण्यांचे महत्त्व नव्या पिढीने जाणून ते आचरणात आणावे.**
- **वाढदिवस, सण-उत्सवावेळी झाडे लावा. बियाणे भेट द्या.**

कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी पोपेरे यांच्या कार्याचे महत्त्व अधोरेखित केले. प्र-कुलगुरू डॉ. जाधव यांनी जे कार्य राहिबाई शेतावर करत आहेत, तेच कार्य आपण विद्यापीठातल्या प्रयोगशाळेत करत असल्याबद्दल समाधान वाटत असल्याचे सांगितले. डॉ. भारती पाटील यांनी प्रास्ताविक केले. यावेळी वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. नितीन माळी, प्रिया देशमुख, अनिल चौगुले आदी उपस्थित होते. डॉ. आसावरी जाधव यांनी परिचय करून दिला. ऊर्मिला दशवंत यांनी सूत्रसंचालन केले. प्रतिभा देसाई यांनी आभार मानले.

### कमी खा, पण शुद्ध खा...

'प्रत्येक घरात, प्रत्येक शेतात आणि अगदी शाळांच्या परिसरातही भाजीपाला पिकवा. दिसायला सुंदर असलेले अन्न नेहमी आरोग्यासाठी चांगले असेलच असे नाही. कमी खा, पण शुद्ध, सात्विक खा', असा संदेश राहीबाई यांनी दिला. त्यांनी जंगलातील वणवे रोखण्याचे आवाहन करणारी आणि रानमेव्याचे महत्त्व अधोरेखित करणारी दोन गाणीही म्हटली.

18 MAR 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'मूटकोर्ट'मुळे विद्यार्थ्यांना न्यायालयाचा अनुभव

## न्यायमूर्ती प्रवीण पाटील यांचे प्रतिपादन : विद्यापीठात राष्ट्रीय मूटकोर्ट व वाद विवाद निवारण स्पर्धा

**जनप्रवास : कोल्हापूर**

मूटकोर्टमुळे विद्यार्थ्यांना न्यायालयीन वातावरणाचा प्रत्यक्ष अनुभव मिळतो, असे प्रतिपादन न्यायमूर्ती प्रवीण पाटील यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या विधी विभागातर्फे आयोजित राष्ट्रीय मूटकोर्ट व वाद विवाद निवारण स्पर्धेला प्रारंभ झाला. या स्पर्धेला राज्यातील विविध विधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



**कोल्हापूर : राष्ट्रीय मूटकोर्ट व वाद विवाद निवारण स्पर्धेत सहभागी राज्यातील विविध विधी महाविद्यालयातील विद्यार्थी.**

कायद्याचे केवळ ज्ञान पुरेसे नसून न्यायालयात प्रभावीपणे मांडणी करण्याचे कौशल्य विकसित होणे गरजेचे आहे आणि अशा मूटकोर्ट स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांमध्ये प्रभावी युक्तिवादाची क्षमता विकसित होते, असेही यावेळी त्यांनी सांगितले. विधी अधिविभागात पार पडलेल्या या स्पर्धेच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर विधी अधिविभागप्रमुख डॉ. विवेक धुपदाळे, डॉ. वर्षा मैदर्गी, ॲड. संदीप मुतालिक, ॲड. गिरीश नाईक, ॲड. संतोष शहा, ॲड. रणजीत गावडे, ॲड. अनुष्का कदम, ॲड. सूर्यकांत मिरजे आदी उपस्थित होते.

न्यायमूर्ती पाटील म्हणाले, आजच्या बदलत्या काळात कायद्याच्या विद्यार्थ्यांनी केवळ कुत्रिम बुद्धिमत्ता किंवा तांत्रिक साधनावर अवलंबून न राहता न्यायालयीन प्रक्रियेचा प्रत्यक्ष अनुभव घेणे आवश्यक आहे. न्यायालयातील वातावरण, युक्तीवादाची शैली, कायद्याचा व्यावहारिक उपयोग यांचा अभ्यास केल्यास भविष्यात यशस्वी वकील म्हणून उभे राहणे अधिक सोपे होते. डॉ. वर्षा मैदर्गी यांनी राष्ट्रीय मूटकोर्ट स्पर्धा आयोजित केल्याबद्दल विधी अधिविभागाचे अभिनंदन केले. त्या म्हणाल्या, अशा प्रकारच्या स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांना आपला वकिली व्यवसाय याचे नियोजन यशस्वीरित्या करण्यास प्रशिक्षण मिळते.

औद्योगिक न्यायालय सदस्य निलेश माळुंजकर यांनी विद्यार्थ्यांना न्यायालयीन कामकाजातील शिस्त, अभ्यासाची सखोलता आणि संशोधनाची भूमिका याबाबत मार्गदर्शन केले. मूटकोर्ट स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांची कायद्यावरील समज अधिक परिपक्व होते. तसेच युक्तिवाद करत असताना आत्मविश्वास वाढतो. चार दिवस चाललेल्या या स्पर्धेमध्ये पहिल्यांदाच विधी अधिविभागाने पहिल्या दोन दिवसांच्या प्राथमिक फेऱ्यांचे नियोजन ऑनलाईन पद्धतीने पार पाडले. या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या दाव्यांचा अभ्यास करून युक्तिवाद सादर केला. स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून निलेश माळुंजकर, ॲड. संदीप मुतालिक, ॲड. गिरीश नाईक, ॲड. प्रमोद दाभाडे. ॲड. सूर्यकांत मिरजे, ॲड. चंद्रकांत पंडागळे, ॲड. अरविंद पाटील, ॲड. खंडेलवाल, ॲड. नंदकिशोर भगवान यांनी काम अहिले. सूत्रसंचालन आकाश कुंभार यांनी केले. आभार ॲड. संतोष शहा यांनी मानले.

या प्रसंगी आकाश कुंभार, योगेश धुरंधर, अंजली पाटील, ओमकार शेळके, शिवरत्न माने, पूजा लोहार, संदीप सुळेकर, वैष्णवी कोळी, गार्गी कुलकर्णी, सर्वेश पाठक, सुरेखा यादव, प्रीती सुखसागर, दिनकर कबीर, सादिका संबोधि, प्रियांका जोशी, रोहन सकट उपस्थित होते.

### स्पर्धेचा सविस्तर निकाल

एलएलबी मूटकोर्ट विजेते (विक्टर दांतस विधी महाविद्यालय, कुडाळ) एलएलबी मूटकोर्ट उपविजेते (विधी महाविद्यालय संजय घोडावत विद्यापीठ) उत्कृष्ट मुटर (एलएलबी मूटकोर्ट) महिमा माने, उत्कृष्ट संशोधक (एलएलबी मूटकोर्ट), कल्याणी देसाई, एलएलएम मूटकोर्ट विजेते शहाजी विधी महाविद्यालय, कोल्हापूर, एलएलएम मूटकोर्ट उपविजेते विधी अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, उत्कृष्ट मुटर (एलएलएम मूटकोर्ट) प्राजक्ता माळी, उत्कृष्ट संशोधक (एलएलएम मूटकोर्ट) सर्वेश पाठक. तसेच वादविवाद निवारण स्पर्धा विजेते - विक्टर दांतस विधी महाविद्यालय, कुडाळ. वाद विवाद निवारण स्पर्धा उपविजेते विधी महाविद्यालय संजय घोडावत विद्यापीठ, कोल्हापूर उत्कृष्ट मध्यस्त अनुश्री देशमुख.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

1 8 MAR 2026

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nimit Corner Appartment, Kolhapur.
Mob.-9175089609

# निसर्गाच्या शाळेनं शिकवलं; तेच लोकांना सांगते : बीजमाता 'पद्मश्री' राहीबाई पोपेरे

## शिवाजी विद्यापीठात दिला माती, जंगल, पर्यावरण वाचविण्याचा संदेश

**कोल्हापूर, (महान्यूज अँड व्ह्यूज) :**

मी कोणत्याही शाळेत शिकले नाही, पण निसर्गाच्या शाळेनं मला जगण्याचं खरं शिक्षण दिलं, तेच मी लोकांना सांगत असते, असं अत्यंत प्रांजळपणानं सांगत बीजमाता 'पद्मश्री' राहीबाई पोपेरे यांनी आपल्या आयुष्यभराच्या कार्याचे इंगित उलगडले. शिवाजी विद्यापीठात आयोजित केलेल्या पद्मराजे स्मृती व्याख्यानमालेत त्यांनी माती, निसर्ग, जंगल आणि रानभाज्या जपण्याचे महत्त्व अधोरेखित करतानाच मानवी जीवन, शेती आणि पर्यावरण यांच्यातील अतूट नात्याची प्रेरक आणि हृदयस्पर्शी मांडणी केली.

शिवाजी विद्यापीठाचे कै. शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन, पर्यावरणशास्त्र अधिविभाग, यशवंतराव चव्हाण सेंटर फॉर रुरल डेव्हलपमेंट आणि समाजशास्त्र अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीमती पोपेरे यांचे 'देशी बियांचे संवर्धन आणि स्त्रियांची भूमिका' या विषयावर विशेष व्याख्यान आज झाले. अध्यक्षस्थानी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव होत्या. व्याख्यानाला कोल्हापूरसह जिल्ह्यातील शेतकरी महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

ग्रामीण पार्श्वभूमीतून आलेल्या राहीबाई पोपेरे यांनी आपल्या सुमारे तासभराच्या अतिशय ओघवत्या भाषणामध्ये स्वतःच्या आयुष्यातील संघर्ष, गरिबी आणि अनुभव यांमधून घेतलेले धडे सांगितले आणि विचार करायला प्रवृत्त केले. त्या म्हणाल्या, निसर्गच आपला खरा गुरु आहे. माती चांगली असेल तर अन्न चांगले येते, अन्न चांगले असेल तर माणूस निरोगी राहतो आणि पुढची पिढी सुदृढ घडते. रासायनिक शेतीमुळे वाढणारे आजार, बदलती जीवनशैली आणि पारंपरिक अन्नधान्यापासून दूर जाण्याचे दुष्परिणाम स्वतःच्या आयुष्यात भोगले. त्यामुळेच देशी वाणांकडे वळले. पूर्वीच्या काळात रानभाज्या, कंदमुळे आणि स्थानिक धान्य खाल्ल्यामुळे लोक दीर्घायुषी आणि निरोगी होते. आज मात्र आपण पैशाने विष खरेदी करून खात आहोत.

राहीबाईंनी पारंपरिक बियाण्यांचे जतन, सेंद्रिय शेती आणि 'किचन गार्डन' या संकल्पनांवर विशेष भर दिला. प्रत्येक घरात,




प्रत्येक शेतात आणि अगदी शाळांच्या परिसरातही भाजीपाला पिकवण्याचे आवाहन त्यांनी केले. दिसायला सुंदर असलेले अन्न नेहमी आरोग्यासाठी चांगले असेलच असे नाही. कमी खा, पण शुद्ध, सात्विक खा, असा संदेश त्यांनी दिला.

जंगल आणि पर्यावरण संरक्षणाबाबत त्या म्हणाल्या, जंगल आपली माऊली आहे. जंगल जाळून आपण स्वतःचं नुकसान करतो. त्यात असंख्य जीवांचा जीव जातो. निसर्ग वाचवायचा असेल तर झाडे, रानभाज्या आणि जैवविविधता जपली पाहिजे. रानभाज्यांचे औषधी गुणधर्म, पारंपरिक बियाण्यांचे महत्त्व आणि स्थानिक अन्नपद्धतीचे वैज्ञानिक मूल्य नव्या पिढीने जाणून ते आचरण्यात आणण्याचे कळकळीचे आवाहन त्यांनी केले. तसेच वाढदिवस, सण-उत्सव यावेळी झाडे लावणे आणि बियाणे भेटी देणे आदी माध्यमातून पर्यावरणपूरक उपक्रम राबवण्याचेही आवाहन केले. यावेळी त्यांनी जंगलातील वणवे रोखण्याचे आवाहन करणारी आणि रानमेव्याचे महत्त्व अधोरेखित करणारी दोन गाणीही म्हटली. तसेच उपस्थितांच्या शंकांचे समाधानही केले.

यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी राहीबाई पोपेरे यांच्या कार्याचे महत्त्व अधोरेखित केले. संकरित वाणांचे दुष्परिणाम ओळखणारी आणि त्याच वेळी शुद्ध देशी बीजाचं महत्त्व लक्षात आणून देणारी महिला म्हणजे राहीबाई असल्याचे त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय मनोगतात प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी राहीबाईंच्या कार्याला अभिवादन करतानाच जे कार्य राहीबाई शेतावर करत आहेत, तेच कार्य आपण विद्यापीठातल्या प्रयोगशाळेत करत असल्याबद्दल समाधान वाटत असल्याचे सांगितले. त्या म्हणाल्या, ज्या त्या भागामध्ये ज्या त्या देशी वाणाचे महत्त्व असते. जे आपल्या परिसरात पिकते, तेच खावे, असे म्हटले जाते. याला कारण तिथली माती असते. एका ठिकाणचे वाण दुसरीकडे नेऊन लावले, तर ते येते; मात्र त्यामध्ये ती चव उतरेलच असे नसते. याला कारण म्हणजे या वनस्पतींच्या मुळाशी विशिष्ट प्रकारचे जीवाणू वाढत असतात. हे जीवाणू त्या विशिष्ट पर्यावरणीय घटकांतच वाढतात. अशा वेळी संबंधित वनस्पती आणि जीवाणू यांचे सहजीवन फुलते. जीवाणू मातीतील आवश्यक घटक वनस्पतीला पुरवितात आणि तिला विशिष्ट चव आणि पोषणमूल्य प्राप्त होते. सर्वच प्रकारच्या रानभाज्यांना हे लागू पडते. दाहशमनार्थ त्या उपयुक्त ठरतात. या अभ्यास व संशोधनासाठीच ॲग्री बायोटेक्नॉलॉजी, मेटाजिनॉमिक्स, सॉईल मायक्रोबायोलॉजी इत्यादी आधुनिक विज्ञानशाखा निर्माण झाल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या सुरवातीला मान्यवरांच्या हस्ते रोपास पाणी वाहून उद्घाटन करण्यात आले. डॉ. भारती पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. आसावरी जाधव यांनी परिचय करून दिला. ऊर्मिला दशवंत यांनी सूत्रसंचालन केले, तर प्रतिभा देसाई यांनी आभार मानले.

कार्यक्रमास वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, निसर्गमित्र अनिल चौगुले, डॉ. नितीन माळी, प्रिया देशमुख यांच्यासह शिक्षक, शेतकरी महिला, नागरिक, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

18 MAR 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nimit Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# राष्ट्रीय 'टेक्नोसिस २०२६' स्पर्धेत २०० हून अधिक विद्यार्थ्यांचा सहभाग

**कोल्हापूर, (महान्यूज अँड व्ह्यूज) :**
शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजीनियरिंग अँड टेक्नॉलॉजी (तंत्रज्ञान अधिविभाग, ) 'टेक्नोसिस २०२६' या राष्ट्रीय स्पर्धेचे रसायन अभियांत्रिकी शाखेतर्फे आयोजन करण्यात आले. विविध महाविद्यालयांतील दोनशेहून अधिक विद्यार्थ्यांनी पोस्टर प्रेझेंटेशन, प्रोजेक्ट मॉडेल, क्विझ, प्रॉडक्ट मॉडलिंग, गेमिंग व रील मेकिंग, या स्पर्धेत सहभाग घेतला.



या स्पर्धेच्या उद्घाटन समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख होते, तर प्रभारी संचालक डॉ. अजित कोळेकर अध्यक्षस्थानी होते. डॉ. देशमुख यांनी आपल्या भाषणात ध्येय, ज्ञान व अथक परिश्रम ही यशस्वी होण्याची त्रिसूत्री असल्याचे सांगितले. शाश्वत विकासासाठी इंजिनिअरिंगचा उपयोग कसा करता येईल, या दृष्टीने काम करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले. डॉ. कोळेकर यांनी शाश्वत विकासाच्या तंत्रज्ञानाची मोठी आवश्यकता असल्याचे सांगितले.

स्पर्धा समन्वयक डॉ. श्रीपाल गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. अरीबा पटेल आणि अक्षदा शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. रक्षिता भोईर आणि संदेश गुळमकर यांनी आभार मानले.

स्पर्धेचे बक्षीस वितरण प्रभारी संचालक डॉ. कोळेकर आणि रासायनिक अभियांत्रिकीचे समन्वयक डॉ. प्रवीणकुमार पाटील यांच्या उपस्थितीत झाले. डॉ. डी एम. नांगरे, डॉ. ए.बी. मडावी, डॉ. प्रशांत पाटील, वैशाली मोहिते, शितल देहनकर, निकिता दिंडे आणि श्वेता सावंत ,मयूर टक्केकर, सुदेश देसाई आणि आदित्य पाटील यांच्यासह रासायनिक अभियांत्रिकीच्या सर्व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

18 MAR 2026

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी
BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# विद्यापीठ विद्यार्थिनी वसतिगृहात हॉस्टेल डे उत्साहात

**कोल्हापूर, (महान्यूज अँड व्ह्यूज) :**

विद्यार्थिनींमध्ये वाचनाची संस्कृती रुजणे आवश्यक आहे, असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थिनी वसतिगृहाच्या हॉस्टेल डे कार्यक्रमात ते बोलत होते.

हॉस्टेल डेच्या निमित्ताने घेण्यात आलेल्या स्पर्धांचा बक्षीस वितरण सोहळा रविवारी (दि. १५) पार पडला. स्पर्धा परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थिनींचा यावेळी सत्कार करण्यात आला. कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी, विद्यार्थिनींना आयुष्यात ध्येय ठरवून ते साध्य करण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे, असे सांगितले. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले यांचे विचारमूल्य डोळ्यांसमोर ठेवून विद्यार्थिनींनी आपले भविष्य घडवावे, असे मत व्यक्त केले. यावेळी उपकुलसचिव प्रिया देशमुख यांनी विद्यार्थिनींना स्पर्धा परीक्षेत अपयश आले, तरी चांगली मेहनत करून




संकटावर मात करावी आणि आयुष्य घडवावे असे आवाहन केले. हॉस्टेल डे निमित्त फुगडी, गायन, एकांकिका इत्यादी वेगवेगळ्या १९ सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

वसतिगृहाच्या मुख्य अधीक्षक डॉ. माधुरी वाळवेकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. कविता वड्राळे यांनी अहवाल वाचन केले. विद्यार्थिनींनीही मनोगत व्यक्त केले. डॉ. मीना पोतदार यांनी आभार मानले. कार्यक्रमाला डॉ. नीलांबरी जगताप, वॉर्डन, कर्मचारी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.